नियमित दिवाणी दावा क्र.१६८/२०२२
विशाखा खंडागळे वि. तानाजी पिसाळ
**MHSN14-001075-2022**

## नि.क्र. ३४ वरील आदेश

१. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून कैफियत व प्रतिदावा दाखल करुन घेण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादीतर्फे असे कथन केले आहे की, वादीच्या दाव्यास सदर प्रतिवादींनी कैफियत दाखल करणेस नि. ३२ ला मुदतीचा अर्ज दाखल केलेला होता. सदरचा अर्ज ८ मार्च २०२३ रोजी नामंजूर करुन सदर प्रतिवादींविरुध्द विनाकैफियत आदेश करुन दावा चौकशीला लावणेत आलेला आहे.

२. प्रतिवादी नं. ३ हा आजारी असलेने व त्याच्या आजारपणाची संपूर्ण जबाबदारी प्रतिवादी नं. १ व २ वर असल्याने प्रतिवादींना एकत्र येऊन कैफियत देणेसाठी आवश्यक ती सर्व माहिती विधीज्ञांना देणे शक्य झालेले नसल्यामुळे व वकील फीसाठी आवश्यक पैशांची जुळणी झालेली नसल्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आलेली नव्हती. सदर प्रतिवादींनी कैफियत दाखल करणेस जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सर टाळाटाळ केलेली नव्हती व नाही. सदर प्रतिवादींची कैफियत व प्रतिदावा दाखल करुन घेतलेस न्यायदानास मदत होणार असून त्यामुळे सर्वांना न्याय मिळणार आहे. सबब, वर नमूद केल्याप्रमाणे परिस्थिती असल्यामुळे सदर प्रतिवादींना कैफियत व प्रतिदावा दाखल करणेची संधी देणे न्यायासाठी अत्यंत आवश्यक आहे. सबब, सदर प्रतिवादींचेविरुध्द करणेत आलेला विनाकैफियत आदेश रद्द करणेत येऊन कैफियत व प्रतिदावा दाखल करुन घेणेबाबत आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

३. वादींतर्फे त्यांचे म्हणणे प्रस्तुत वर दाखल करुन त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी नं. १ ते ३ यांचा सदरचा अर्ज व त्यातील संपूर्ण मजकूर खोटा, लबाडीचा व बेकायदेशीर असून प्रस्तुत वादी यांना मान्य व कबूल नाही. वादी यांनी सदरचा दावा हा दि. ०५/१२/२०२२ रोजी दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी त्याचवेळी नि.क्र. २० ला वादी यांच्या ताकीद अर्जास म्हणणे दिलेले

असून दि. २२/१२/२०२२ रोजी वादी यांचा ताकीद अर्ज मंजूर झालेला होता व आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी सदर अर्जामध्ये आजारपणाबाबतची व आर्थिक स्वरुपाची नमूद केलेली कारणे ही पूर्णपणे खोटी व लबाडीची असल्याचे स्पष्ट होते. एवढेच नव्हे तर सदर कथीत कारणाबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा प्रतिवादी यांनी दाखल केलेला नाही. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करणेस जाणीवपूर्वक सुमारे दीड वर्षाचा विलंब केलेला आहे. तसेच, त्याबाबतचे कोणतेही संयुक्तिक कारण प्रतिवादी यांनी त्यांचे अर्जात नमूद केलेले नाही. सबब, सदरचा अर्ज फेटाळण्यास यावा. तसेच प्रतिवादी यांना हेवी कॉस्ट करणेत यावी असे कथन केले आहे.

**४.** प्रतिवादींचा अर्ज व वादींचे म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादी दि. ०७/१२/२०२२ रोजी प्रकरणात हजर झाले व त्यानंतर त्यांनी नि. क्र. २० वर तूर्तातूर्त ताकीद अर्जास म्हणणे दाखल केले. तदनंतर दोन्ही बाजुंचा तूर्तातूर्त ताकीद अर्जावर युक्तिवाद होऊन दि. २२/१२/२०२२ रोजी ताकीद अर्ज मंजूर करण्यात आला. तदनंतर प्रतिवादीतर्फे कैफियत देणेत आली नाही. दि. ०८/०३/२०२३ रोजी प्रतिवादींतर्फे देण्यात आलेला मुदत अर्ज नामंजूर होऊन प्रतिवादींविरुध्द कैफियत नाही चा आदेश पारीत करण्यात आला. तदनंतर दि. १९/०८/२०२४ रोजी प्रतिवादींतर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादींनी प्रकरणात हजर होऊन देखील जवळपास दीड वर्ष कैफियत दाखल केली नाही. वादीतर्फे प्रतिवादीच्या अर्जातील कथने नाकारुन विलंबाकरीता संयुक्तिक कारण नसल्याचे कथन केले आहे. मात्र, प्रतिवादीतर्फे झालेल्या विलंबाबाबत अर्जामध्ये कथने केलेली आहेत.

**५.** प्रस्तुतचा दावा निरंतर व मॅण्डेटरी मनाईसाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचे देखील हक्क हितसंबंध आहेत. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जासोबत कैफियत तसेच प्रतिदावा दिलेला आहे. त्यामुळे त्यांना कैफियत देण्याची संधी दिल्यास न्यायदानासाठी त्याचा उपयोग होणार आहे. त्यामुळे उभय पक्षांपैकी कोणाचेही नुकसान होणार नाही. दावा गुणदोषांवर चालवून निकाली

करणेस मदत होणार आहे. मात्र प्रतिवादींतर्फे झालेल्या विलंबाची भरपाई म्हणून प्रतिवादींनी वादींना र.रु. १,५००/- कॉस्ट देवून अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नि.क्र. ३४ प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी वादींना र.रु. १,५००/- कॉस्ट म्हणून देण्याच्या अटींवर मंजूर करण्यात येतो.

२. कॉस्ट रक्कम दिलेनंतर प्रतिवादी नं. १ ते ३ यांची कैफियत व प्रतिदावा रेकॉर्डवर घेण्यात यावा.

DESAI VINAYA ATMARAM
Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2024.09.12 15:14:02 +0530

शिराळा (व्ही. ए. देसाई)

दिनांक १०/०९/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.S. Gondkar |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 10/09/2024 |
| order signed by the Presiding Officer on | : | 12/09/2024 |
| order uploaded on | : | 12/09/2024 |